# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

विषय:–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत

## ! प्रकटन !

ऑटिस्टिक (स्वमग्न) या प्रकारातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलतीसंदर्भात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती खालीलप्रमाणे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षांसाठी प्रविष्ट होणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१७/(११८/१७)/एसडी-६, दि. १६ ऑक्टोबर २०१८ नुसार विविध सवलती मंडळाकडून दिल्या जातात.

केंद्र शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांसंदर्भात स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) निश्चित केलेले असून एखाद्या विद्यार्थ्याकडे जर दिव्यांग प्रमाणपत्राऐवजी असे स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) असेल व त्यांनी सदर प्रमाणपत्र विभागीय मंडळ कार्यालयास दिव्यांग प्रस्तावासोबत सादर केलेले असल्यास विविध सवलतीकरीता अशा विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) यांनी प्रतिस्वाक्षरी असलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी करू नये असे क्र.रा.म./परीक्षा ५/५१८० दि. ०३/११/२०२३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती दिल्या जातात.

उपरोक्तप्रमाणे सन २०२३-२४ पासून कार्यवाही करण्यात येत असून निर्धारित सुविधेपासून कोणताही दिव्यांग विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता मंडळाकडून घेण्यात आलेली आहे. जरी एखाद्या विद्यार्थ्याकडे स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) नसले तरी त्याच्याकडे विहीत नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र असेल तर अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती देण्याबाबतची कार्यवाही मंडळाकडून केली जाते.

त्यामुळे याबाबत संबंधित प्राचार्य, मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थी यांनी संभ्रम बाळगू नये.

दिनांक:-३०/०७/२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

---

क्रमांक पुविम/माध्य.–क/ 6652
पुणे–४११००५
दिनांक: 31/०७/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा
सर्व मान्यता प्राप्त शाळा व
जिल्हा:- **पुणे, अहमदनगर, सोलापूर.**

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२वी व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ-१० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेला सवलतीबाबत..

**संदर्भ :-** राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा. म./परिक्षे-५/२७१७ दि. ३०/०७/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व मान्यता प्राप्त शाळा यांना कळवीण्यात येते की, संदर्भीय पत्रानुसार राज्यमंडळ पुणे यांनी सूचीत केल्यानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२वी व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ-१० वी) परीक्षासाठी प्रविष्ट होनाऱ्या ऑटिस्टिक (स्वमग्न) या प्रकारतील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलतीसंदर्भात दि. दि. ३०/०७/२०२५ रोजी वर्तमाणपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषगाने प्रकटन सोबत जोडले आहे.

त्यामुळे याबाबत सांबाधित प्राचार्य,मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थी यांनी संभ्रम बाळगू नये.

(कैलास दातखीळ)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे